महाराष्ट्र शासन
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि.५/ औद्योगिक प्रदर्शन/२०२५/ 733
दिनांक : - 4 MAR 2025

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,खाजगी विनाअनुदानित पदवी, पदविका व
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय :** पुणे महानगर पालिका आयोजित औद्योगिक प्रदर्शनास महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट देणेबाबत..
**संदर्भ :** समाजविकास विभाग पुणे महानगर पालिका यांचे पत्र क्र.सविवि/३३९५,दि. २८/२/२०२५

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, पुणे महानगर पालिकेच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त बचत गटातील महिलांना/शिक्षण घेत असलेल्या मुलींना औद्योगिक क्षेत्रामध्ये रोजगाराची संधी मिळावी,स्वयंरोजगार व औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी या उद्देशाने पुणे महानगर पालिका समाजविकास विभाग व सिंहगड इन्डस्ट्रीयल असोसिएशन आणि मराठी चेंबर ऑफ कॉमर्स इन्डस्ट्रीज अँण्ड अग्रीकल्चर यांचे संयुक्त विद्यमाने ७५ महिला उद्योजिकांच्या औद्योगिक उत्पादनांचे प्रदर्शन दि. ७ मार्च २०२५ ते दि. ९ मार्च २०२५ या कालावधीमध्ये सकाळी १०.०० ते रात्री ९.०० या वेळेत गणेश कलाक्रिडा मंच, प्रदर्शन हॉल,स्वारगेट,पुणे येथे आयोजित करणेत येणार आहे.

सदर प्रदर्शनांमध्ये औद्योगिक क्षेत्रातील महिला उद्योजिका सहभागी होणार असून त्याच बरोबर नामवंत कंपन्यांचा सुध्दा सहभाग असणार आहे.व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणेकरीता वेगवेगळ्या विषयांवर परिसंवाद आयोजित करणेत येणार आहे. या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश बचत गटातील महिलांना/शिक्षण घेत असलेल्या मुलींना उद्योजिकतेकडे वळविणे,त्यांना व्यवसाय करणेसाठी प्रेरित करणे,व्यवसायाच्या नवनवीन संधीची माहिती करून देणे हा आहे.

तसेच सदरच्या प्रदर्शनामध्ये तांत्रिक शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देखील भेट दिल्यास त्यांच्या भविष्यातील उद्योग विषयक ज्ञानामध्ये भर पडून त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग व्यवसाय जवळून पाहता येणे शक्य होईल.तसेच उद्योजिकांशी संवाद साधनेची संधी उपलब्ध होऊ शकेल .त्याच बरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांचे उद्योग संदर्भातील प्रकल्प सादर करावयाचे असल्यास सदर प्रदर्शन ठिकाणी जागा उपलब्ध करून देता येईल.

तरी क्षेत्र कार्याचा अनुभव आपल्या विद्यार्थ्यांना मिळावा या दृष्टीने सर्व संस्थांनी आपल्या संस्थेतील अध्यापक व विद्यार्थ्यांना सदरच्या औद्योगिक प्रदर्शनास भेट देण्यासाठी प्रोत्साहित करावे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.भा\परिपत्रक २०२४.docx